# आकाशातील

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ...
दा. क्र. १८३८



BVBK-0401737

# आकाशातील चांदण्या

वाचनालय
वा. वा.
१७३८
२५१२५८४

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल ग्रंथ विभाग.
वा. क्र. १७३८ दिनांक ........
विषय ............ क्र. २........

सौ. मुमताज रहिमतपुरे

BVBK-0401737

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६००८

आकाशातील चांदण्या

Akashatil Chandanya

सौ. मुमताज रहिमतपुरे

Sou. Mumataj Rahimatpure

प्रकाशन क्रमांक ३३

प्रथम आवृत्ती १९८४

प्रकाशक /

सौ. नंदिनी तु. गवळी

५१३ ब, प्लॉट नं. ४ अ, नलवडे माळ,

प्रतिभानगर पिछाडीस, सागरमाळ,

कोल्हापूर-४१६ ००८

मुद्रक /

दि. गं. कुलकर्णी

राजहंस प्रिंटिंग प्रेस,

नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६ ००३

फोन : २३९०६

मूल्य – रु. ७ फक्त

© इकबाल कासिम रहिमतपुरे

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –

मे. सिद्धार्थ बुक सेंटर

गाळा नं. २०, प्रतिभानगर मार्केट, सागरमाळ,

कोल्हापूर-४१६ ००८

म. गां. मं. कर्वे, ग्रंथालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १८३८ दिनांक ....
विषय ........ क्र. १२/१९९८


# ऋतुचक्र

जगाची निर्मिती झाली होती. देवांचा राजा झुज याने देव–देवतांना त्यांची कामे वाटून दिली होती. सर्व देव–देवता ऑलिंपस पर्वतावर रहात होते. डीमीटर ही धनधान्य, फळेफुले पिकविणारी देवता होती.डीमीटर आपली कन्या प्रॉझरपिनबरोबर पृथ्वीवर राहत होती. ती कामानिमित्त सतत फिरावयाची.

प्रॉझरपिन ही अतिशय सुंदर,नाजूक होती. आपल्या आईची फार लाडकी होती. मायलेकींना एकमेकीशिवाय चैन पडायचे नाही. डीमीटर जेव्हा बाहेर जाई तेव्हा प्रॉझरपिन आपल्या मैत्रिणी, समुद्रकन्याबरोबर खेळायची,गप्पा मारायची, फिरायला जायची. त्यामुळे डीमीटरला लेकीची काळजी वाटायची नाही.

नेहमीप्रमाणे डीमीटर बाहेर गेली होती. प्रॉझरपिन मैत्रिणीबरोबर फुलं गोळा करायला निघाली. सुंदरसुंदर हिरव्या गवतातून फुले डोकावत होती. ती फुले विविध रंगी होती, छान वासाची होती. प्रॉझरपिन ही फुले पाहून आनंदून गेली. ती फुले तोडत होती. परडीत साठवत होती. वेगळ्या प्रकारचं फूल दिसलं

की तिकडे धावत होती. असं करता करता ती एकटीच मैत्रिणी-पासून वेगळी पडली. ती आपल्या नादातच फुले तोडत पुढेपुढे जात होती. भान विसरली होती.



एकदम प्रॉझरपिनला अतिशय सुंदर फूल दिसले. अगदीच वेगळच्या प्रकारचे फूल होते ते. त्याच्या असंख्य पाकळ्यातून मधूर वास येत होता. त्या फुलाचा वास साऱ्या आसमंतात भरून गेला होता. ती फूल तोडावयास पुढे झुकली. इतक्यात चमत्कार झाला. जमीन दुभंगली. त्या जागेतून एक सोन्याचा रथ वेगाने दौडत आला. तो रथ स्वतः पाताळनगरीचा राजा हेडस चालवत होता. प्रॉझरपिन हा चमत्कार पाहून गोंधळून गेली. घाबरून गेली. तिला काही उमजायच्या आत हेडसने तिला अलगद आपल्या रथात घेतले. रथ आला तसा वेगाने परत फिरला.

प्रॉझरपिन ओरडू लागली. रडू लागली. हेडसच्या हातून निसटायचा प्रयत्न करू लागली. आईस हाका मारू लागली. आपला पिता झुज याला मदतीला बोलावू लागली. स्वर्ग, पृथ्वी समुद्र आणि सूर्याची किरणं जोपर्यंत तिला दिसत नाही तोपर्यंत ती मदतीसाठी आक्रोश करीत होती. तिचा आक्रोश हेकेट देवतेने

ऐकला. सूर्यदेवाने ऐकला. तसा झुज व डीमीटरनेही ऐकला. काही मानव त्यावेळी झुजची पूजा करून प्रार्थना करीत होते. ती तो स्वतः स्वीकारण्यासाठी त्यांचेकडे गेला होता. त्यामुळे त्याने आपल्या लेकीस हेडस पळवून नेत असताही दुर्लक्ष केले. हेडस त्याचा भाऊ होता.

डीमीटरच्या कानी प्रॉझरपिनचा आक्रोश आला तशी ती वेगाने घरी परतली. प्रॉझरपिनचा ती शोध घेऊ लागली. भेटेल त्याला ती विचारी – माझी प्रॉझरपिन पाहिली कां कुणी ? सगळीकडे तिला नकार मिळाला. नऊ दिवस डीमीटर वेड्या–सारखी लाडक्या लेकीचा शोध घेत फिरत होती. दहाव्या दिवशी तिला हेकेट भेटली. हेकेटने तिला सांगितले, मी नुसता प्रॉझरपिनचा आवाज ऐकला. पण तिला कोणी पळवून नेले हे मी पाहिले नाही. शेवटी सूर्यदेवाकडे डीमीटर गेली. त्याला तिने विचारले. तो उत्तरला – ' प्रॉझरपिनला पाताळलोकच्या राजाने नेले आहे. ' आणि पुढे मखलाशी जोडली. ' तो तिला योग्य असाच वर आहे. '

डीमीटरला राग आला. तिच्या लाडक्या लेकीला हेडसने सवतीने पळवून नेले. आणि तिचा पिता झुज गप्प बसला होता. डीमीटरला झुजचा राग आला. हेडसची चीड आली आणि मग ती रूसून बसली.

डीमीटर रुसली. सगळीकडे अनर्थ कोसळला. पृथ्वीवर संकटाची मालिका चालू झाली. डीमीटरने निश्चय केला. प्रॉझरपिन जोपर्यंत तिला परत मिळत नाही तोपर्यंत पृथ्वीवर

धनधान्य पिकवावयाचे नाही. झाडाला फळे येणार नव्हती की फुलं फुलणार नव्हती. तिच्या रागामुळे जमीन उजाड झाली. तिला भेगा पडल्या. नद्या, नाले आटून गेल्या. सगळीकडे हाहाकार माजला. भयानक दुष्काळ पडला. रोग-राई फैलावली. मानवजात धोक्यात आली.

हे सर्व पाहिल्यावर झुजला चिंता पडली. मानवजात त्याची लाडकी होती. त्यांना वाचावयाचे झाले तर डीमीटरचा रूसवा घालवणे अवश्य होते. आणि डीमीटरचा रूसवा प्रॉझरपिन तिला मिळाल्याशिवाय जाणार नव्हता.

प्रथम झुजने डीमीटरकडे एका देवतेस दुती म्हणून पाठवले. या देवतेने झुजचा निरोप डीमीटरला सांगितला. झुजने डीमीटरला ऑलिंपसवर येण्याची आज्ञा केली होती. डीमीटरने झुजची आज्ञा पाळावयास स्पष्ट नकार दिला.

मग मात्र झुजने आपला दूत हरमीज याला वेगाने पाताळनगरीत जाण्याचा आदेश दिला. हरमीजला सांगितले:— " जा आणि हेडसला माझी आज्ञा सांग की प्रॉझरपिनला ताबडतोब तिच्या आईकडे परत पाठव. नाहीतर मोठा अनर्थ होईल."

हरमीजही वेगाने पाताळनगरीत गेला. हेडसने त्याला पाहिल्याबरोबर त्याच्या येण्याचा उद्देश ओळखला. तो मनात खिन्न झाला. हरमीजने हेडसला झुजची आज्ञा सांगितली. हेडसने मानवजातीच्या कल्याणासाठी झुजची आज्ञा मान्य करण्याचे ठरविले.

पण हेडस खरोखरीच प्रॉझरपिनवर मनापासून प्रेम करीत

होता. त्याला ती पत्नी म्हणून हवी होती. त्यासाठी त्याने गुप्तपणे प्रॉझरपिनला डाळिंब खावयास दिले. आता आपण आपल्या आईकडे परतणार या आनंदाच्या भरात तिने डाळिंबाचे काही दाणे खाल्ले. डाळिंब हे पाताळनगरीत फार पवित्र मानले जाते. पाताळनगरीतील डाळिंब खाल्ले असता त्या व्यक्तीस परत पाताळनगरीत जावेच लागते असा तेव्हाचा दंडक होता.

हरमीज प्रॉझरपिनला घेऊन डीमीटरकडे आला. मायलेकींना एकमेकीस पाहून खूप आनंद झाला. दोघींची भेट अपूर्व होती. डीमीटरला शंका आली. प्रॉझरपिनला हेडसने आपल्या जाळ्यात ओढले असावे म्हणून.तिची शंका खरी ठरली. प्रॉझरपिनला परत पाताळनगरीत जावे लागणार होते.तिथे तिथले डाळिंबाचे दाणे खाल्ले म्हणून. तिचा आनंद नाहीसा झाला. ती निराश झाली.

स्वतः झुजने डीमीटरची समजूत काढली. तिच्याशी समझोता केला. त्याने सांगितले,प्रॉझरपिनला परत पाताळनगरीत जावेच लागणार. मग हेडसशी तिचे लग्न लावून द्यावे. ती पाताळनगरीची राणी म्हणून मोठ्या दिमाखात राहील. डीमीटरला तिचा विरह अजिबात सहन होत नाही म्हणून प्रॉझरपिन सहा महिने तिच्याकडे येऊन राहील. सहा महिने ती आपल्या पतीबरोबर पाताळनगरीत राहील.

डीमीटरने झुजचे म्हणणे मान्य केले. आपला राग शांत केला. प्रॉझरपिनचा हात हेडसच्या हाती दिला. सहा महिने का होईना प्रॉझरपिनचा सुखद सहवास आपल्याला मिळणार म्हणून

हेडसही सुखावला.

तेव्हापासून प्रॉझरपिन सहा महिने सासरी व सहा महिने माहेरी राहू लागली.

ती जेव्हा माहेरी येते तेव्हा सर्व पृथ्वी प्रॉझरपिनचे अत्यंत आनंदाने स्वागत करते. शेतात पिके डुलत असतात. वृक्ष फळांनी भारावलेले असतात. सर्व प्रकारची फुले फुललेली असतात. सगळीकडे वसंत ऋतूचे राज्य असते. प्रॉझरपिन पृथ्वीवर आपल्याबरोबर आनंद घेऊन येते आणि जाताना जणू ती तो आनंद घेऊन जाते. कारण ती जेव्हा सासरी परतते तेव्हा पृथ्वी कोमेजून जाते. जमीन उजाड होते. थंडी आणि बर्फाचे साम्राज्य पृथ्वीवर चालू होते.

आणि अशा रीतीने पृथ्वीवर ऋतुचक्राचा जन्म झाला.

□ □

# माधुरी

एक सुंदर राजकन्या होती. तिचं नाव आपण माधुरी ठेवू हं ! तर ही माधुरी सुरेख होती हे तर झालंच. मनानं हळवीही होती. वागण्यानं स्वच्छंदी. सर्वांना ती आवडायची. आई-बाबांची लाडकी अन् प्रजेची भारी आवडती होती ती ! सारे सुखात होते. माधुरी आनंदात होती.

पण या सुखात आणि आनंदात मिठाचा खडा पडला. चालायचंच ! सुखाची चव चाखल्यावर दुःख सामोरी यायचंच. सारेच दिवस कसे चांगले असतील ?

माधुरीचे आई–बाबा एकामागोमाग वर्षाच्या अंतरानं स्वर्गलोकी गेले.ती एकटीच राहिली. राजा-राणीला माधुरीशिवाय दुसरे मूलबाळ नव्हते. राज्याच्या गादीवर माधुरीचा अधिकार होता. एका शुभ दिवशी प्रजेनं मोठ्या समारंभानं माधुरीचा राज्याभिषेक केला. ती राणी झाली. प्रजेला राणी मिळाली. राणीला प्रजा.

माधुरी राणी झाली. त्यामुळे तिला आता या राणीपदाला शोभेल असे वागणे भाग होते. डोक्यावरील मुगुटाबरोबर तिच्याकडे प्रजेला चांगलं सांभाळण्याची जबाबदारी देखील आली.

माधुरीला प्रथम आपल्या या नव्या पदाची फारच गंमत वाटली. सारे तिच्या हुकूमाप्रमाणे घडे. तिच्या अवतीभोवती सुंदर सुंदर सेविकांचा तांडा उभा राहू लागला. या सेविका तिचा प्रत्येक शब्द झेलण्यात तत्पर असत. तिला खूष ठेवण्यास झटत असत.

राज्यातील काही वयोवृद्ध मंडळी माधुरीचे सल्लागार बनले. कित्येक उन्हाळे–पावसाळे त्यांनी पाहिले होते. त्यांचे केस पिकले होते. त्यांना खरा अनुभव होता. चांगला राज्य कारभार कसा चालवावा याचा सल्ला ते माधुरीस देत. त्याप्रमाणे माधुरी वागे. तिच्या राज्यातील प्रजा सुखी–समाधानी झाली.

माधुरी तरुण होती. सुंदर होती. खरं तर तिचे मौजमजा करण्याचे हे दिवस.पण आता तिचा सारा वेळ राज्य जबाबदारीनं चालविण्यात जाऊ लागला.हळूहळू तिला आपल्या या राणीपदाचा कंटाळा येऊ लागला. नको ही राज्य चालविण्याची जबाबदारी असंही वाटू लागलं.

मोकळं एकटंच फिरावं. गावं, नाचावं, बागडावं असं तिला वाटू लागलं. पण तिच्या सोबत असायचा सेविकांचा तांडा किंवा केस पिकलेल्या म्हाताऱ्या सल्लागारांचा वेढा! ती कंटाळून गेली. वैतागून गेली. राणी होण्यातली मज्जा आता तिला वाटेनाशी झाली. पण आता ही जबाबदारी टाळायची कशी ? मोठा प्रश्न होता.

असेच काही दिवस गेले. वसंत ऋतूचं आगमन झालं. सगळी झाडं हिरव्या रंगानं न्हाऊन गेली. धरतीचाही हिरवा

गालिचा बनला. सुंदर सुंदर फुलं हसू लागली. पक्षी आकाशात पंख पसरून भिरभिरू लागले. आनंदानं मधुर आवाजात गाऊ लागले. सगळीकडे आनंदीआनंद बहरला.

माधुरीनं आपल्या राजवाड्यातल्या गच्चीवरून हे सारं वसंत ऋतूचं वैभव निरखलं.तीही आनंदानं भारून गेली. पक्षांचं मुक्त उडणं आणि मधुर गाणं आपणही अनुभवावं असं तिला वाटू लागलं किंवा धावत जाऊन धरतीच्या मऊ हिरव्या गालिचावर लोळण घ्यावी अशी इच्छा तिला होऊ लागली. पण ती राणी होती. तिच्या संरक्षणासाठी एक फौज खडी होती. मग तिला एकटीलाच कसं बाहेर जाता येणार ?

सुंदर निसर्ग हसत होता. तिला खुणावत होता. तिचं मन बाहेर धावायला उसळ्या मारू लागलं.

माधुरीनं ठरवलं – आपण येथून गुपचुप सर्वांचा डोळा चुकवून चक्क पळून जायचं. राणीपणाचा मान झुगारून द्यायचा. जबाबदारीचं ओझं फेकायचं. तिनं मुकूट उतरवून ठेवला. आपल्या सेवकांची, पहारेकऱ्यांची नजर चुकवून ती बाहेर पडली.

तिच्या पायात सुंदर नाजूक चप्पल होते. अंगावर रेशमी साडी होती. मुलायम केस वाऱ्यावर भुरभुरत होते. धावत धावत ती जंगलात आली. थोडी विसावली. मग तिची नजर भिरभिरू लागली.

तिनं पाहिलं काही थोड्या अंतरावर तंबू उभारले आहेत. आजूबाजूस रंगीबेरंगी झगे, झंपर, रूमाल वाळत आहेत. काही

लमाणी स्त्रिया आपल्या झग्याचा घेर फिरवीत नाचत आहेत. काही गात आहेत, कांही टाळ्या वाजवत हंसत आहेत. दुसऱ्या बाजूस लमाणी पुरुषांचा अड्डा. आरामशीरपणे गप्पा मारत हास्य विनोद करीत बसला आहे.

लमाणांचं मुक्त हंसू ऐकून माधुरीला आपल्याला हवं ते सापडल्याचा आनंद झाला. तिलाही त्यांच्यासारखं आनंदानं हसावसं वाटू लागलं.

ती हलकेच त्या लमाणींजवळ गेली. त्यांनी पाहिलं – आपल्याकडे एक सुंदर नाजूक मुलगी येते आहे. त्या गप्प झाल्या तरी त्यांचे डोळे मात्र हर्षानं लुकलुकत होते. माधुरी त्यांच्या कोंडाळ्यात बसली. सगळ्याजणी तिला निरखू लागल्या. त्यांना ही माधुरी आवडली.

एकीनं विचारलं – कोण ग तू ?

ती म्हणाली – मी माधुरी !

दुसरी उत्तरली – नांवासारखीच मधुर आहेस हो !

माधुरी चक्क लाजली. ते पाहून त्या खळखळून हसल्या.

माधुरी हळूच पुटपुटली– अन् तुम्हीही मला आवडलात !
त्यानी आनंदानं टाळ्या वाजविल्या. माधुरीला लमाणांचं आयुष्य आवडलं. हे लमाण लोक सदैव एका गावाहून दुसऱ्या गावास जात असतात. एकाच गावी फार दिवस मुक्काम करीत नाहीत. त्यांचा तांडा सतत पुढेच चालत राहतो. लमाण

निसर्गाच्या सान्निध्यात असल्यामुळे निर्भय, स्वच्छंदी, आनंदी बनले आहेत. त्यांचं जीवन पक्ष्यासारखं असतं. आज इथं तर उद्या तिथं आणि त्यांना कशाचीही काळजी करणं जमत नाही. माधुरीला अशा या लमाणांच्या तांड्यात सामील व्हावसं वाटू लागलं, म्हणजे तीही त्यांच्यासारखीच स्वच्छंदी, निर्भय, आनंदी बनली असती. कसली जबाबदारी, काळजी तिला भेडसावू लागली नसती. ती मुक्त हंसली असती.

तिनं हळूच लमाणी स्त्रियांना विचारलं –

मी तुमच्याबरोबर येऊ ?

चकीत होऊन त्या एकमेकीकडं पाहू लागल्या. परत माधुरीनं तोच प्रश्न केला. त्या स्तब्ध झाल्या. काही बोलेनातच त्या.

काकुळतीनं येत माधुरी म्हणाली – का ग तुम्ही गप्प ? सांगा ना ? मी तुमच्याबरोबर येऊ ? मी माझ्या आयुष्याला कंटाळले आहे हो !

त्यांच्यातील एक समजूतदार स्त्री म्हणाली– तुला खरंच का आमच्यात सामील व्हायचं आहे ?

माधुरीनं होकारार्थी मान डोलावली. अन् उत्साहानं म्हणाली मला तुमचं मुक्त, स्वच्छंदी आयुष्य जगायचं आहे. तुमच्यासारखं मनमोकळं हसायचंय तुमच्याबरोबर फिरायचंय, गायचंय, नाचायचय साऱ्या साऱ्या जबाबदारीतून, चिंतेतून मुक्त व्हायचंय मला. मला तुमच्याबरोबर येऊ द्या.

ती स्त्री परत म्हणाली– तुला आमच्याबरोबर यायचंय, आमचं आयुष्य जगायचंय, होय ना ? मग आमचं आयुष्य जगण्यासाठी तुला काहीतरी किंमत द्यावी लागेल. सुखासुखी आमचं आयुष्य तुला जगायला नाही मिळायचं ! याला तुझी तयारी आहे ! देतेस तू किंमत ?

माधुरीनं आश्चर्यानं विचारलं– कसली किंमत ?

तिच्या पाठीवरून हात फिरवीत ती उत्तरली–

होय पोरी, आपल्याला हवं ते मिळविण्यासाठी कांहीना कांही किंमत मोजावी लागते.

आमचंच पहा ना, आमचं भटकं मुक्त आयुष्य, स्वच्छंदी वागणं, बोलणं, हसणं तेवढं सर्वांना दिसतं. पण आम्ही कोणकोणत्या संकटाशी सामना देतो, कोणते कष्ट घेतो याची कल्पना आहे का तुला ?

माधुरीनं डोळे विस्फारून विचारलं– तुम्हाला संकटाशी सामना द्यावा लागतो ?

ती सांगत होती– हो. आमच्या आयुष्याचा तुला लवकरच कंटाळा येईल. तू नाजूक आहेस, सुंदर आहेस, तुझ्या कपड्यावरून चपलावरून, दागदागिन्यावरून तू थोरा – मोठ्यांची मुलगी दिसतेस. आता आमच्या पायाकडे पहा. आमचे पाय अनवाणी असतात. या अनवाणी पावलानी आम्ही रस्ता तुडवत असतो. दऱ्याखोऱ्यातून, डोंगरमाथ्यावरून, कांट्याकुट्यातून चालत

असतो. तुझ्या या नाजूक पावलांना भटकणं नाही सोसायचं तुझी पावलं या कष्टप्रद चालण्यानं रक्ताळून जातील. आम्ही एका गावाहून दुसऱ्या गावी जात असता जेथे नदी, नाले, धबधबा दिसेल तेथे खळाळत्या पाण्यात अंघोळ करतो. हे पाणी गार असतं पण तुला गरम पाण्यानं स्नान करायची सवय असणार. गार पाण्याची अंघोळ तुला सोसायची नाही. आमचं जेवणं काय असतं हे तुला माहीत आहे ? आम्ही कोरडी भाकर खातो. तू मात्र रोज पंचपक्वान्न जेवत असशील. आमची कामं आमची आम्हीच करतो. दुसऱ्यावर कोणी आपलं काम् येथे सोपवत नाही. तुझ्या अवतीभोवती सेवकवर्ग घोटाळत असणार तेच तुझी सारी कामं करीत असणार आणि हो आम्ही एका गावाहून दुसऱ्या गावात भटकत असता आमच्यावर कुत्री भुंकतात. ती आम्हाला चावायला धावतात कारण आम्ही त्या गावात अनोळखी असतो. कधी कधी ती कुत्री आमचे कपडे फाडतात. ती कुत्री तुझ्याही अंगावर अशीच झेपावतील. थंडीवाऱ्यात पावसापाण्यात आम्ही गावोगाव भटकतच असतो. तुझ्या शरिराला या साऱ्यांची संवय नाही. शिवाय आमच्यापैकी कोणाला मरणाला सामोरं जावं लागलं तर तेथेच क्रियाकर्म करून आम्ही पुढं जातो. असं आमचं खरं जीवन आहे. आम्ही सुखी समाधानी, आनंदी राहण्यासाठी या सर्व संकटाशी सामना देतो.

तूं हे सारं सहन करणार असशील तर अवश्य आमच्या तांड्यात सामील हो. पण विचार करून काय ते ठरव. आम्हांला तू फार आवडलीस.

माधुरी हे सारं ऐकून हबकून गेली. तिनं विचार केला.

आपलं शरीर नाजूक आहे. आपल्या या नाजूक शरिराला नेहमी आरामात रहायची संवय आहे. आपलं शरीर आणि मन वेगळ्या वातावरणात वाढलं आहे. ही लमाणीन सांगते तसं त्याच्या-बरोबर राहू शकू का ?

तिनं दुःखानं निर्णय घेतला— त्यांच्याबरोबर न जाण्याचा. हा निर्णय घेताना तिला खरोखरंच वाईट वाटलं. पण तिला वाटलं या बायकांना आपली आठवण राहण्यासाठी कांहीतरी भेटी द्याव्यात. तिनं आपल्या गळयातील सोन्या मोत्याच्या माळा काढल्या. हातातल्या हिऱ्या माणकाच्या अंगठ्याही काढल्या. त्यांना या भेटी तिनं दिल्या त्यांचा निरोप घेतला.

दुःखी मनानं, जड पावलानं ती त्यांच्याकडे पाठ फिरवून आपल्या राजमहाली निघाली. ती परत डोक्यावर मुकुट ठेवून आपलं राज्य सांभाळणार होती.

राणी महाली नाही हे पाहून दासीवर्ग व पहारेकरी हवालदील झाले होते. सारे आपल्या राणीस शोधत होते. ती परत येताना पाहून त्यांना हायस वाटलं.

तिनं मागं वळून पाहिलं. लमाणांचा तांडा निघाला होता. ते अनवाणी पावलाने चालत होते. खदखदून हसत होते. त्यांचं ते हास्य ऐकून तिच्या काळजात कळ उठली. पण नाईलाज होता. . . . आपआपलं आयुष्य प्रत्येकानं जगायचं असतं !

□

# कावळा, घुबड आणि कोकिळ

एकदा काय झालं. एक मुलगा जंगलात फिरायला गेला. तो मजेत हिंडत होता. त्याच्या हाती एक गलोल होती. अधून-मधून तो गलोलीत दगड घालायचा, उडवायचा. चालता चालता मुलाने एका गर्द झाडाकडे पाहून गलोल उडवली. दगड सूऽऽऽऽ करून थेट निघाला. तो पानांच्या गर्दीत लपून बसलेल्या घुबडाला लागला.



झालं ! घुबड जखमी झाले. वेदनानी तळमळू लागले.

याचवेळी त्याचा मित्र कावळा त्याला भेटायला आला. त्याला घुबड म्हणाले, " मित्रा मला मदत्त कर रे. माझं दुखणं बरं करायला मदत कर. काहीतरी उपाय सुचव. "

घुबडाचे बोल ऐकून कावळा म्हणाला, ' दोस्त, अरे तुला वैद्याकडे गेले पाहिजे. त्याच्याशिवाय तू बरा नाही होणार. चल मी तुला कोकिळ वैद्याकडे घेवून जातो. "

पक्षी जगतात कोकिळची उत्तम वैद्य म्हणून कीर्ती होती. तो जणू पक्षांचा धन्वंतरी होता. दुखणाईतास त्यांच्या उपचाराचा हमखास गुण येत असे. कोकिळ वैद्याचे औषध घ्यावयाचे घुबडाचे मान्य केले.

घुबड आणि कावळा कोकिळला शोधू लागले. कोकिळ जेव्हा त्यांना दिसला तेव्हा त्यांना खूप आनंद झाला.

कोकिळने घुबडाला काळजीपूर्वक तपासले. काय झाले ते त्याच्या लक्षात आले. घुबडाच्या अंगात चिखलाचा एक लहानसा गोळा घुसला होता.

" कोकिळ गंभीरपणे म्हणाला, मी माझे निदान केले आहे. पण माझ्या उपचाराची फी फार आहे. "

फी संबंधी कोकिळ बोलला त्याचें कारण. पक्षी जगतात घुबड खोटार्डा म्हणून माहित होता. त्यामुळे त्याचेवर कोणाचा विश्वास नव्हता.

घुबड म्हणाले, " असू दे ! वैद्य बुवा तुमची फी जबर

असली तरी चालेल, पण माझ्यावर कृपा करून लवकर उपचार करा. मला खूप खूप त्रास होतो आहे, "

तरीही कोकिळ उपचार करायला धजेना. कोकिळ का इलाज करावयास घुटमळतो आहे हे कावळ्याच्या लक्षात आले. म्हणून कावळा म्हणाला, " काळजी करू नका वैद्यबुवा. तुमची फी तुम्हाला मिळेल. याची मी हमी देतो. आता सांगा बरं उपाय ! "

कोकिळ म्हणाला, " मीं पाण्याचा उपचार सुचवितो. तुम्ही पाण्याचे एक डबके शोधा. त्यामध्ये घुबडाला बसवा. थोड्याच वेळात घुबडाचा आवाज बरा होईल. "

घुबडाला कावळ्याने एका झाडावर बसायला सांगितले. आणि स्वतः कावळा घुबडासाठी पाण्याचे डबके शोधायला गेला. इकडे तिकडे तो खूप उडाला. मग खूप शोधाशोध केल्यावर आरामात बसता येईल असे डबके सापडले. घुबडाला त्या डबक्यात बसवून कावळा आपल्या घरटी परतला.

घुबड डबक्यात बसले. एक तास झाला. दोन तास झाले. हळू हळू शरिरातील चिखलाचा गोळा मऊ होवू लागला. मग हळू हळू माती पाण्यात विरघळू लागली. माती जसजशी पाण्यात विरघळू लागली तसतसे घुबडाला बरे वाटू लागले. वेदना कमी होवू लागल्या. अंगातील सर्व माती निघून गेली. घुबडाला बरे वाटू लागले. हळूच घूबड पाण्याबाहेर आले. आपल्या ढोलीत परतले.

आपण बरे झालो म्हणून घुबडाला आनंद व्हायला

पाहिजे होता. कोकिळने चांगला उपाय सुचविला म्हणून त्याचे आभार मानायला पाहिजे होते. पण तसे झाले नाही. उलट घुबड स्वत:लाच नावे ठेवू लागला. मूर्ख म्हणू लागला. आपल्याला एवढा साधा उपाय का सुचला नाही म्हणून !

दुसऱ्या दिवशी कोकिळने घुबडाला बोलाविले पण आपण सांगितलेला उपचार घुबडाला लागू झाला की नाही हे त्याला पहायचे होते. घुबडाचा आजार नाहीसा झाल्याचे पाहून त्याला आनंद झाला. कोकिळ म्हणाला, " मला आनंद झाला, माझा उपचार उपयोगी आला म्हणून. " अर्थात त्या बोलण्यातून त्याला सुचवायचे होते की घुबडाने त्याची फी द्यावी.

घुबड चिडले, म्हणाले ' डबक्याच्या पाण्यात बसणे याला तू उपाय म्हणतोस ? '

कोकिळ म्हणाले, ' होय. तो माझा उपाय होता. आणि त्यामुळे तुझे दुखणे नाहीसे झाले. म्हणून तू आता मला माझी फी दिली पाहिजेस "

" छे ! छे ! तू हा उपाय सांगितलास खरा. पण यासाठी तुला एक पैही खर्च करावी लागली नाही. म्हणून मी फी देणार नाही ! "

कोकिळने एक उसासा सोडला. कारण असे काहीतरी होईल असे त्याला वाटले होते.म्हणून कोकिळ कावळ्याच्या शोधात बाहेर पडला. कावळ्यास तो भेटला ! कावळ्याने हमी घेतली.

कावळा म्हणाला. " काही काळजी करू नका वैद्य बुवा. अहो अधूनमधून घुबडाला अशी गंमत करायची सवय आहे. चला आपण दोघे जाऊन त्याच्याशी बोलू. "

पण घुबड कोठे लपले होते कोणास ठाऊक ? कोकिळ आणि कावळा त्याला शोधून शोधून दमले. घुबडाला हाका मारल्या पण घुबड काही सापडले नाही.

कोकिळ म्हणाला, '' हं ! आपण दोघेही फसलो. तू त्याची हमी दिली आहेस आता तूच माझी फी दे ! '

न लाजता कावळा म्हणाला– ' माझ्यापाशी माझी अशी एक पैदेखील नाही. मग मी फी कोठून देणार ? '

कोकिळ म्हणाला, " मग तू हमी कशाला घेतलीस ? माझी फी तू द्यायलाच पाहिजे. "

कावळा फी द्यायला कबूल होईना. कंटाळून कोकिळने न्याय मिळावा म्हणून फिर्याद केली. न्यायाधिशाने कोकिळाचे म्हणणे ऐकून घेतले.त्याने न्याय दिला. तो कावळयाला म्हणाला, " तू हमी घेतलीस म्हणून कोकिळने उपाय सुचविला. घुबडाने फसविले. तरी तू कोकिळला त्याची फी द्यावीस ! "

कावळा ताबडतोब म्हणाला,'पण माझ्यापाशी पैदेखील नाही.'

न्यायाधीश उत्तरले, मग तुला फीचे कर्ज कोकिळचे काम करून फेडले पाहिजे. ते काम म्हणजे पुढील सर्व काळामध्ये तुला कोकिळच्या अंड्याची काळजी घेतली पाहिजे. '

आजसुद्धा घुबड लपून बसते. त्याला भीती वाटते. कावळा आणि कोकिळ त्याला शोधून काढतील आणि बदला घेतील. म्हणून तो ढोलीत लपून बसतो. रात्र झाली की अन्न शोधायला बाहेर पडतो आणि आजसुद्धा कोकिळच्या अंड्याची कावळा काळजी घेतो.काय करतो बिच्चारा !! (बर्मी परीकथा)

□ □

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ९.७३७ दिनांक ........
विषय ... ..... क्र. ......

# सिंह आणि कालूलूची शाल

एक जंगल होते. तेथे कालूलू नावाचा ससा रहात होता. एके दिवशी कालूलूने स्वत:साठी एक शाल बनवायची ठरविली. यासाठी तो दाट जंगलात गेला. त्याला पाहिजे होते ते झाड शोधून काढले. त्या झाडाची पुष्कळशी साल काढून त्याने घरी आणली. आता ही साल मऊ मऊ करायला हवी होती.

कालूलू शाल बनविण्याच्या खटपटीस लागला. कष्ट करू लागला. पण काही केल्या ती मऊ होईना. शेवटी तो कंटाळला.

ही शाल मऊ कशी करायची ? कालूलूला प्रश्न पडला. तो मनात म्हणाला, ‘ माझ्यासाठी कोणी तरी ही शाल बनविली पाहिजे. शिवाय ती मऊपण झाली पाहिजे. पण कोण बरं असं माझ्यासाठी काम करील. ’ कालूलू विचार करू लागला आणि एकदम त्याच्या डोक्यात दिवा पेटला. अरे हो ! सिंहाला कसा बरं मी विसरलो ? तो खूप शक्तीशाली आहे. माझ्यासाठी तो उत्तम शाल बनवू शकेल ! ’

कालूलू आणखी विचारात पडला. कारण सिंहाला हा

इवलासा ससा काम कसे सांगणार ? पण कालूलू असा गप्प बसणार होता थोडाच ! तो उठला. सिहाच्या गुहेपाशी आला. हळूच डोकावून पाहिले. सिंह गुहेत होता. कालूलू गुहेच्या बाहेर झुडपाआड दडून बसला.

थोड्या वेळाने सिंह, सिंहीण शिकारीसाठी गुहेबाहेर पडले. कालूलू थोडा वेळ थांबला, मग गुहेत गेला. सिंहाचा छावा खेळत बसलेला त्याला दिसला. त्याला कालूलू रुबाबात म्हणाला, ' काय रे मुला, तुझे आईवडील कोठे आहेत ? मी त्यांच्यासाठी काम आणले आहे. ' छावा म्हणाला– ' माझे आई बाबा शिकार करण्यासाठी बाहेर गेले आहेत. '

कालूलूने झाडाच्या सालीचा मोठासा तुकडा छाव्यापुढे ठेवला आणि म्हणाला, ' हे बघ छोकऱ्या, तुझ्या बाबांना निरोप सांग. या सालीपासून एका विशिष्ट व्यक्तीसाठी मऊ शाल बनवा म्हणून. शाल अगदी मऊ मऊ झाली पाहिजे म्हणावं. आणि ती लवकर बनवायला सांग बघ. '

छावा म्हणला, ' मी सांगतो बाबांना हा निरोप. ' पण छाव्याला माहीत नव्हते निरोप सांगणारी व्यक्ती कोण होती ते.

बऱ्याच वेळाने सिंह व सिंहीण शिकार करून परतले. सिहाला झाडाच्या सालीचा तो तुकडा दिसला. त्याने विचारले.. ' हे काय आहे ? '

छावा उत्तरला, 'एक विशिष्ट व्यक्ती तुम्ही घरी नसताना आली होती. तो म्हणाला– ' तुझ्या बाबांसाठी काम आहे. या

सालीपासून त्यांनी माझ्यासाठी मऊ मऊ शाल बनवली पाहिजे. ती पण लवकर.'

'पण त्या विशिष्ट व्यक्तीचे नाव काय?' सिंहाने विचारले.

छावा म्हणाला, ' मी त्याला ओळखत नाही बाबा ! '

सिंहाने सालीचा तुकडा उचलला आणि मऊ शाल बनविली.

' सिंहाने शालीचे काम कुठंपर्यंत केले आहे ते पाहिले पाहिजे.' कालूलू मनात म्हणाला. म्हणून दुसऱ्या दिवशी तो पुन्हा सिंहाच्या गुहेपाशी आला. लपून बसला. सिंह-सिंहीण शिकारीला बाहेर पडल्याचे पाहूनच तो गुहेत शिरला. सिंहाचा छावा आजपण एकटा होता. खेळत होता.

कालूलू त्याला म्हणाला, 'काय रे मुला, तुझे बाबा आजही घरी दिसत नाहीत. पण हो त्यांनी माझी शाल बनवली का ? '

छावा म्हणाला, ' माझे आईबाबा आजसुद्धा शिकारीसाठी बाहेर गेलेत. पण त्यांनी तुमची शाल बनवून ठेवली आहे. '

कालूलूने शाल हाताळून पाहिली. ती चांगलीच झाली होती. कालूलू म्हणाला, ' हे बघ मुला, तू तुझ्या बाबांना सांग. शाल बरी झाली आहे म्हणावं. आता या शालीवर ठिपक्यांची नक्षी काढा. त्यामुळे ही शाल अधिक सुंदर दिसेल. '

छावा म्हणाला– ' बरं ! सांगतो मी तुमचा निरोप. ' कालूलू आपल्या घरी परतला. काही वेळाने सिंह-सिंहीण गुहेकडे परतली.

छावा म्हणाला, ' बाबा आज पुन्हा ती विशिष्ट 'व्यक्ती येऊन गेली. तिने सांगितले की शाल बरी बनलीय. आता या शालीवर ठिपक्यांची नक्षी काढा म्हणजे शाल सुंदर दिसेल म्हणून.'

सिंह म्हणाला, ' अरे पण ती विशिष्ट व्यक्ती कोण आहे? मी तिच्यासाठी का काम केले पाहिजे ?'

छावा बारीक आवाजात बावरून म्हणाला, ' मी त्याला ओळखत नाही बाबा ! '

सिंह कामाला लागला. शाल हाती घेतली. त्यावर ठिपके काढू लागला. काही ठिपके चित्याच्या ठिपक्यांसारखे, कांही बिबळ्या वाघाच्या ठिपक्यांसारखे, त्याने शालीवर काढले. त्यामुळे शाल सुंदरच दिसू लागली.

दुसऱ्या दिवशी काल्लू म्हणाला, ' सिंहाने माझे काम कुठंवर पूर्ण केले आहे ते पाहिले पाहिजे.' तो सिंहाच्या गुहेपाशी आला. सिंह सिंहीण गुहेतच होती. काल्लू झुडपाआड लपून बसला.

थोड्या वेळानं सिंह, सिंहीण आणि सिंहाचा छावा पाणी पिण्यासाठी नदीकडे निघून गेले. गुहेतून सर्वच्या सर्व बाहेर पडल्याचे पाहूनच काल्लू गुहेत शिरला, तर शाल एका कोपऱ्यात तयार होऊन पडल्याचे त्याला दिसले. त्याने शाल हातात घेऊन पाहिली. ओ होहो! किती सुंदर ठिपक्यांनी शाल सजली होती! तो आनंदित झाला. शाल घेऊन सरळ घरी परतला.

सिंह, सिंहीण, छावा पाणी पिऊन परतले. तर तयार करून ठेवलेली शाल कुठे दिसेना. शाल कुणीतरी उचलून नेलेली ! सिंह चिडला. संतापला. डरकाळी फोडून म्हणाला. 'ती विशिष्ट

व्यक्ती कोण होती ? त्याच्यासाठी मी काम केले पण त्याने कामाचा मोबदला देऊ नये म्हणजे काय ? '

आपणाकडून कोणीतरी काम फुकट करून घेतले याचा सिंहाला अतिशय राग आला. या व्यक्तीला पकडण्यासाठी सिंहाने एक युक्ती योजली.

सिंहाने जंगलातील सर्व प्राण्यांना मेजवानीचे आमंत्रण दिले. कालूलूलाही सिंहाने आमंत्रण दिले.

मेजवानीचा दिवस उजाडला. कालूलूने आपली नवीन सुंदर ठिपक्याने नटलेली शाल बरोबर घेतली. सिंहाच्या गुहेकडे जाण्याच्या रस्त्यावर आडोशाला तो बसला.

अनेक प्राणी त्या रस्त्यावरून लगबगीने सिंहाच्या गुहेकडे जात होते. काही प्राण्यापाशी चांगले कपडे होते. कांहीपाशी नव्हते.

आणि शेवटी कालूलूला माकड येताना दिसले. कालूलू पुढे झाला. म्हणाला, ' नमस्ते दोस्ता ! '

माकडही म्हणाले, ' नमस्ते कालूलू ! '

कालूलूने विचारले, ' दोस्ता ! कुठे निघाला आहेस एवढ्या गडबडीने ! '

माकडाने उत्तर दिले, 'मी सिंहाकडे निघालो आहे मित्रा! आज त्याच्याकडे मेजवानी आहे ना ? '

कालूलू उत्साहाने म्हणाला, ' मी पण तिकडेच निघालो आहे. चल. आपण दोघे मिळून जाऊ. '

दोघे संगतीने चालू लागले. चालता चालता कालूलू म्हणाला, ' काय रे मित्रा, मेजवानीसाठी निघाला आहेस. मग अंगावर शालबील नाही का पांघरायचीस ? मेजवानीस जाताना तर शाल पाहिजे गड्या ! '

माकड गरीबपणे म्हणाले, ' काय करू मित्रा ? माझ्यापाशी शाल नाही आणि शाल करायला मला वेळच मिळाला नाही बघ ! '

कालूलू गंभीरपणे म्हणाला, ' तुझ्यासारख्या मोठ्या व्यक्तीपाशी सिंहाकडे जाताना चांगलीशी शाल असू नये याचे मला खूप वाईट वाटते !

माकड म्हणाले, ' मग मी काय करू ? '


कालूलू तत्परतेने म्हणाला, ' तू माझा मित्र आहेस. मला तुला मदत करावीशी वाटते. ही मी माझी ठिपक्यांची शाल तुला आजच्या दिवस उसनी देतो. ती तू पांघर आणि मेजवानीस चल.'

माकड आनंदाने हुरळले. त्याच्याकडे पाहून कालूलू म्हणाला, ' पण मित्रा माझी एक अट आहे. ती तुला कबूल आहे का पहा ! '

' काय ? अट ? कसली ? ' माकडाने विचारले. ' ही शाल मी तुला उसनी देतो. पण चुकूनसुद्धा कोणाला सांगायचे नाही. शाल मी तुला उसनी दिली आहे म्हणून. कबूल ? ' कालूलूने विचारले. माकडाने ही अट लगेच मान्य केली.

कालूलूची शाल पांघरून माकड मोठ्या ऐटीत सिंहाच्या गुहेपाशी आले. कालूलू सोबत होता.

सिंहाने माकडाकडे पाहिले. त्याने श्रमून तयार केलेली



ठिपक्यांची शाल माकडाने पांघरलेली दिसली. तो मनात म्हणाला, ' हे माकड होय ती विशिष्ट व्यक्ती ! माझ्याकडून फुकट काम करून घेणारी ! मी काय याचा नोकर आहे होय असे काम करायला ? ' त्याच्या मनांत राग मावेना. सिंहाने संतापाने माकडाच्या अंगावर उडी मारली. माकडाने ती उडी चुकवली. सिंहाचा अवतार पाहून माकड भ्याले. भीतीने झाडावर उडी ठोकली आणि अगदी पार शेंड्यापर्यंत गेले. या गडबडीत माकडाच्या अंगावरून शाल पडली.

कालूलू पुढे झाला. सिंहाला म्हणाला, " सिंहराज ! सिंहराज ! माझ्यापाशी शाल नाही. मी ही शाल घेऊ काय? "

सिंह उदारपणे म्हणाला, ' ठीक आहे ! सध्या तू ही शाल ठेवून घे. '

कालूलूने साळसूदपणे शाल घेतली. मेजवानीवर ताव मारला. ढेकर देत देत आणि अंगावरची शाल सावरत तो रूबाबात घरी परतला ! पण माकड मात्र सिंहाच्या भितीने उंच झाडावरच बसून राहिले ! बिचारे ! (रूपांतरीत)

# आकाशातील चांदण्या

मी ही गोष्ट खूपदा ऐकली आहे. ती सांगतेच तुम्हाला.

एका गावात एक लहान मुलगी रहात होती. ही मुलगी आपली सारखी रडायची ! रड रड रडायची. कशासाठी माहीत आहे ? या मुलीला म्हणे आकाशातल्या चांदण्या हव्या होत्या ! त्याही खेळासाठी ! गंमतच आहे की नाही ? आकाशातील चांदण्या कोणाला कशा खेळायला मिळणार ? त्या काय वाटेवर पडल्या का होत्या! पण ही गोष्ट त्या लहानगीला कोठे कळतेय? ती आपल्या चांदण्या खेळायला मिळत नाहीत म्हणून रडायची! अगदी मनापासून रडायची !

एका सुंदर सकाळी ही लहानगी घराबाहेर पडली. कशासाठी म्हणता ? अहो चांदण्या शोधण्यासाठी ! कितीतरी वेळ लहानगी सारखी चाल चाल चालत होती. चालताना ती एका छोट्या धरणापाशी आली.

लहानगी तिथे थांबली. धरणाला म्हणाली– 'नमस्ते ! मी किनई चांदण्या शोधते आहे. मला त्या खेळायला पाहिजेत म्हणून. तुम्ही त्यांना पाहिले आहे का कुठे ?

धरण आनंदाने उत्तरले ' होय ग गोड पोरी, चांदण्यांना मी पाहिलेय. त्या खटयाळ चांदण्या मी झोपत नाही तोपर्यंत सारख्या रात्रीच माझ्या तोंडावर चमकत असतात. तू माझ्या पाण्यात बुडी मार. कदाचित तुला एखादी चांदणी सापडेल वघ.'

हे ऐकल्याबरोबर लहानगीने धाडकन पाण्यात उडी मारली. छानपैकी पोहता येत होते तिला. पोहता पोहता ती पाण्यात कुठे चांदणी दिसते का पहात होती. खूप पोहून ती दमली पण तिला एकही चांदणी सापडली नाही की दिसली नाही. पोहता पोहता मात्र ती एका लहानशा ओढ्यापाशी आली.

लहानगी ओढ्याला म्हणाली, 'नमस्ते लहानग्या ओढ्या ! मी किनई चांदण्या शोधते आहे. मला त्या खेळायला हव्यात ! तू एखादी चांदणी पाहिली आहेस ?

ओढा हसला. म्हणाला, ' होय, मी चांदण्या पाहिल्यात, लहानगे ! या चांदण्या रात्री माझ्या किनाऱ्यावर चमचम करतात. तू हाताची वल्ही करून माझ्या किनाऱ्यावर वल्हवून पहा. कदाचित तुला एखादी चांदणी सापडेल.'

लहानगी लगेच आपल्या छोटया हातांनी तिथे वल्हवून पाहू लागली. आणि हळू हळू किनाऱ्या किनाऱ्याने जाऊ लागली. अर्थात हाताचे वल्हे हलवित ! पण तिला काही चांदणी गवसेना. अशीच ती मग एका गावी आली. तिथले लोक एकत्र जमलें होते. त्या लोकांमध्ये लहानगी गेली आणि सर्वांना तिने नमस्ते केले. ते भले लोक होते. सर्व लोक लहानगीकडे पाहू लागले. तोच ती म्हणाली, ' मी किनई चांदण्या शोधण्यासाठी घराबाहेर पलेड. तुम्हाला एखादी चांदणी दिसली काय ?

लोक म्हणाले, ' होय ग गोड छोकरी ! आम्ही चांदण्या पाहिल्यात.या चांदण्या रात्रीच्या इथल्या हिरवळीवर चमकतात. आज तू आमच्याबरोबर खूप नाच आणि कोणी सांगावे, तुला एखादी चांदणी मिळून जाईल. '

आपली ही लहानगी रात्रभर नाचत होती. नाचून नाचून ती थकली. पण छे ! चांदण्या काही सापडेनात !

ती हिरमुसून खाली बसली. मान खाली घालून बसली, मला वाटते, रडत पण होती !

लहानगी निराशेने म्हणाली ' मी एखादी चांदणी मिळावी, म्हणून पोहले, हाताचे वल्हे करून ओढयाचा किनारा वल्हवला, नाचलेसुद्धा ! पण त्याचा काही सुध्दा उपयोग झाला नाही. तुम्ही लोक फार चांगले आहात. तुम्ही मला मदत करा नाहीतर मला चांदण्या खेळायला मिळायच्या नाहीत हो !

सर्व लोक एकमेकांशी कुजबूज करू लागले. काहीतरी बोलू लागले. मग त्यांपैकी एकजण पुढे झाला. लहानगीच्या पाठीवर मायेने थोपटत म्हणाला, ' पोरी, तू घरी आपल्या आईकडे चांदण्या घेतल्याशिवाय परत जाणार नसशील तर सांगतो. अशीच पुढे जा. लक्षात ठेव, उजव्या रस्त्याने सरळ पुढे जायचे. मग तू चार पाय असणाऱ्याला तुला पाय नसणाऱ्याकडे न्यायला सांग. नंतर पाय नसणाऱ्याला सांग की तुला अशा जिन्याकडे ने की ज्याला पायऱ्या नाहीत. आणि तू तो बिनपायऱ्यांचा जिना चढू शकलीस तर–'

' मग मी आकाशातील चांदण्यांमध्ये असेन ! होय ना ?' लहानगी मध्येच आनंदाने ओरडली.

‘ जर तू तिथे नसशील तर मग कोठेतरी असशील! ’ एवढे बोलून तो उठला. सगळे लोक परत नाच करण्यात मग्न झाले.

उत्साहाने लहानगी तेथून निघाली. चालता चालता ती एका झाडाला बांधलेल्या घोड्यापाशी आली. घोड्यावर जीन कसलेले होते.

घोड्याला सुध्दा लहानगीने ‘ नमस्ते केले आणि म्हणाली, ‘मी चांदण्या शोधते आहे. त्या मला खेळायला पाहिजेत. तू मला पाठीवर घेऊन जातोस का ? माझे अंग चालून चालून फार दुखते आहे. ’

घोडा म्हणाला, ‘ मला चांदण्या बिंदण्या माहीत नाहीत. मी इथे फक्त भल्या लोकांची आज्ञा पाळण्यासाठी उभा आहे. मी माझी इच्छा आहे म्हणून काही इथे उभा नाही राहिलो ! ’

लहानगी उत्तरली – ‘ बरं ! बरं ! मी त्या भल्या लोकांकडूनच आलेय. त्यानीच चार पाय असणाऱ्याला पाय नसणाऱ्याकडे मला न्यायला सांगिलंय. ’

घोडा म्हणाला, ‘ मग उडी मार आणि माझ्या पाठीवर स्वार हो. ’

लहानगी घोड्यावर स्वार झाली. घोडा वाऱ्यासारखा धावू लागला. मोठे जंगल त्याने पार केले आणि मग त्यांना कळले की आपण समुद्रकिनाऱ्यावर आलो आहोत. या समुद्राच्या पाण्यावर त्यांच्यासमोर भला रूंद असा एक चमचम करणारा सरळ रस्ता गेलेला दिसला.त्या रस्त्याच्या पलीकडे किनाऱ्यावरील

पाण्यातून एक अतिशय सुंदर वस्तू उभी होती. ती वस्तू आकाशात गेली होती. या वस्तूवर जगातले सर्व रंग विखुरलेले दिसत होते. निळा, लाल, हिरवा, जांभळा, केशरी - - आणि ते रंग अतिशय सुंदर दिसत होते.

घोडा म्हणाला, ' उतर आता. मी तुला जमिनीच्या शेवटच्या टोकाला आणले आहे. चार पाय असणाऱ्याला करता येण्यासारखे होते ते केले, आता मला माझ्या घरी लोकांत गेले पाहिजे. '

लहानगी म्हणाली, ' पण पाय नसणारा कुठे आहे ! पायऱ्या नसणारा जिना कुठे आहे ? '

घोडा म्हणाला, ' ते मला माहीत नाही आणि मला माहीत असून करायचे काय ? बरं मुली यशस्वी हो ! ' आणि एवढे बोलून घोडा निघून गेला.

लहानगी समुद्राकडे एक टक पहात राहिली. तो तिला दिसले, एक मोठा विचित्र मासा तिच्याकडे येतो आहे.

लहानगीने माशाला ' नमस्ते ' केले आणि सांगितले, ' मी आकाशातील चांदण्या शोधते आहे आणि त्यांच्याकडे नेणारा जिना कुठे आहे हे पहाते आहे. तुम्ही मला त्याचा रस्ता दाखवाल का ? '

मासा चट्कन म्हणाला, ' मुळीच नाही ! भल्या माणसांचा शब्द आणल्याशिवाय मी कोणाला तो रस्ता दाखविणार नाही. '

लहानगी उत्तरली– ' मी भल्या माणसांचा शब्द आणला आहे. त्यांनी मला सांगितले की, तुला चार पायाचा, पाय नसणाऱ्याकडे नेईल आणि पाय नसणारा, पायऱ्या नसणाऱ्या जिन्यापाशी घेऊन जाईल. '

मासा म्हणाला, ' ठीक आहे. माझ्या पाठीवर चढ आणि मला घट्ट धर बरं का ! '

मग तो मासा चांदीसारख्या चमचमणाऱ्या रस्त्यावरून सपासप जाऊ लागला. ती चमकणारी कमान होती तिकडे जाऊ लागला. जसजसे ते चमचमणाऱ्या कमानीपाशी जाऊ लागले तसतशी ती अधिकच चमकू लागली. ती कमान इतकी चमकत होती की लहानगीला आपले डोळे मिटून घ्यावे लागले.

कमानीजवळ आल्यावर लहानगीला दिसले की ती कमान म्हणजे एक मोठाच्या मोठा रस्ता होता. तो रस्ता वरवर आकाशात चढल्यासारखा गेला होता आणि त्याच्या शेवटच्या टोकाला चिमुकल्या चमकणाऱ्या वस्तू नाचत होत्या.

मासा म्हणाला– ' इथवर तू आलीस खरी. तो बघ तो जिना. तू हा जिना चढू शकलीस तर चढ बापडी. पण लक्षात ठेव. घरातला जिना चढण्याइतकी ही गोष्ट सोपी नाही. जिना घट्ट पकड आणि मग चढ बरं का ! ' एवढे सांगून मासा पाण्यात नाहीसा झाला.

लहानगी जिना चढू लागली. चढायचा प्रयत्न करू लागली. पण एकही पाऊल तिला जिन्यावर टाकता येईना.

चकाकता प्रकाश तिच्यापुढे होता. आजूबाजूला होता आणि पाणी मागच्या बाजूस होते. ती जेवढा म्हणून जिना चढायचा प्रयत्न करायची तेवढ्याच चट्कन मागे पाण्यात पडायची. परत ती जेवढ्या उंच चढायची तेवढ्याच खोल पाण्यात पडायची. पण ती पाण्यातून परत यायची व जिना चढायचा प्रयत्न करायची. आणखी पाण्यात पडायची. प्रकाशामुळे आणि प्रयत्नामुळे डोळ्यांना अंधारी येईपर्यंत ती तो जिना चढत होती आणि पाण्यात पडत होती. थंडीमुळे थरथर कापत होती. तरीही वेड्यासारखा चढण्याचा प्रयत्न करीत होती. पाण्यात बुडत होती. गटांगळ्या खात होती. भिंतीला धडक देत होती आणि लहानगीच्या लक्षात आले, आपण आपल्या बिछान्यावर एकटेच आहोत ! आणि रडत आहोत !

( आधारित )

□ □

म. ग्रं. सं. ठाणें, [illegible] शाखा.
बाल कुमार विभाग
दा. क्र. 9636 दिनांक 22/12/15
विषय

## नवा मानव
### ग्रीक कथा

पृथ्वीवर मोठी कठीण परिस्थिती होती. राक्षस मातले होते. त्यांनी नुसता धुमाकूळ माजविला होता. पृथ्वीवर सगळीकडे हाहाकार उडाला होता. एवढेच नव्हे तर राक्षसांनी देवाविरुद्ध युद्ध पुकारले. देवांचे निवासस्थान ऑलिंपसवर चढाई केली. मग मात्र देवाधीदेव ज्युपिटर खवळला. चिडला. आपल्या सर्व सामर्थ्यानिशी त्याने सर्व राक्षसांना पाणी पाजले. त्यांचा पराभव केला. त्यांचा धुव्वा उडविला. रक्ताने न्हाऊ घातले. मगच ज्युपिटर शांत झाला. पृथ्वीने नि:श्वास टाकला.

आणखी एक नवल घडले. या रक्ताने न्हालेल्या पृथ्वीवर नवीन मानवजात निर्माण झाली. वाढू लागली. श्वासोश्वास करू लागली. पण ही मानवजात फार क्रूर होती. उद्दाम होती. त्यांच्यामध्ये राक्षसांचा स्वभावगुण आला होता. कारण देवांचा तिरस्कार करणाऱ्या राक्षसांच्या पराभूत रक्तातून ती निर्माण झाली होती. जास्ती करून आरकाडीयाचा राजा लिकॉन(Lycam)हा देवांचा फार तिरस्कार करी.त्याचा द्वेष करी.

एके दिवशी ज्युपिटरने ठरविले, पृथ्वीवर जायचे. नवीन मानवजात कशी आहे ते पहायचे. त्याने वेष पालटला. पृथ्वीवर आला. बारकाईने निरीक्षण केले आणि त्याला वाईट वाटले. त्याला दिसले नवा मानव फारच उद्दाम आहे. एवढेच नव्हे लिकॉनसारखा राजा ज्युपिटरच्या देवत्वावर विश्वास ठेवायला

तयार नाही. सगळेच क्रूर उद्दाम राक्षसी वृत्तीची आहेत.

ज्युपिटर विचार करू लागला. असली माणसे पृथ्वीला भारभूत आहेत. त्यांना कसल्या निष्ठा नाहीत. नाही देवावर विश्वास मग असल्या माणसांना कशाला जिवंत ठेवायचे. विचार करता करता त्याचा राग वाढू लागला. आणि त्याने ठाम ठरविले ही मानवजातच नष्ट करायची !

ज्युपीटरने प्रथम ठरविले– आपले शक्तीशाली वज्र पृथ्वीवर फेकावे. सर्व मानवांचा नाश करावा. मग यातला धोका त्याच्या लक्षात आला. वज्रामुळे पृथ्वीवरील सृष्टी जळून जाईल. नाश पावेल. सृष्टीचा यात काय बरे दोष, आपल्याला नुसती मानवजात नष्ट करायची आहे. यावर विचार करता त्याला उपाय सुचला. जोरदार वारे निर्माण करून पृथ्वीवर मुसळधार पाऊस पाडायचा. म्हणजे सर्व मानवजात पाण्यात बुडून नाश पावेल. ज्युपीटर या कामगिरीवर मग्न झाला.

ज्युपिटरने उत्तरवारा कोंडला. बंदिस्त केला. ढग आकाशभर पसरविले. आणि दक्षिणवाऱ्यास मोकाट सोडले. इरिस ( Iris ) देवता पाण्याने ढग भरू लागली. नेपच्यूनने आपल्या त्रिशूलाने पृथ्वीस जोरदार झटका दिला. त्याबरोबर नद्या सैरावैरा धावू लागल्या. धावता धावता त्यांनी सर्व पठार व्यापले. मग त्या घरेच्या घरे गिळंकृत करू लागल्या. जिकडे तिकडे पाणीचपाणी झाले. पाऊस मुसळधार पडतच होता. धरती–आकाशात पाण्याशिवाय काहीच दिसत नव्हते. सारे जग जणू किनारा नसलेला महासागर बनले. असल्या प्रलयात प्राणी, माणसे वहात होती. बुडत होती. नष्ट होत होती. काही उरली ती भुकेने बेजार

झाली आणि मेली. पक्षी सुद्धा उडून उडून थकले. पंखातले बळ सरले तेव्हा पाण्यात पडली, असा जिकडे तिकडे प्रलय माजला. भयानक पाऊस खवळून खवळून पडत होता. पाण्याची पातळी वाढवत होती. पर्वतासारख्या लाटा निर्माण होत होत्या.

ज्युपिटर चिडून मानवजात प्रलयात नष्ट करत होता. पण त्याला भान होते.पूर्ण मानवजात नष्ट करावयास तो तयार नव्हता. त्या दुष्ट जगात एक जोडपे असे होते की जे फार श्रद्धाळू होते. त्याचा देवावर विश्वास होता. चांगल्यावर विश्वास होता. सरळ मनाचे साधे होते ते. या जोडप्याला या जगबुडीतून वाचवावयाचे आणि मानवजात टिकवायची.

हे जोडपे म्हणजे प्रॉमेथुअसचा मुलगा डिकॅलिऑन ( Devcalion ) आणि त्याची बायको पी–हा (Pyrrha) दोघेजण एका छोटया नावेत बसली होती. देवाचा धावा करत होती. प्रार्थना मनोभावे करीत होती. देवांना अजिबात दोष लावत नव्हती. लक्षावधी माणसं मेली पण ही दोघं देवावर विसंबून होडीत बसली होती. हे सर्व जोव्हने पाहिले. आता प्रलय पुरेसा झाला हे त्याला उमगले. त्याने उत्तर वाऱ्यास मोकळे सोडले. ढगांना, पावसाला त्याने माघार घ्यायला लावली. आतापर्यंत पृथ्वी व आकाशातला फरक कळत नव्हता. आता तो फरक दिसू लागला. आकाश ओळखू येऊ लागले.पृथ्वी आकाशाला दिसली आणि आकाश पृथ्वीला दिसले.

समुद्रदेव नेपच्युनने आपला मुलगा ट्रीटन याला बोलाविले आणि सांगितले, ' तुझा शंख जोराने फुंक आणि लाटा व प्रवाह यांना माघारी बोलव. ' ट्रीटनने आपला शंख मोठ्याने फुंकला. लाटा व प्रवाह माघारी आले. शांत झाले.

डिकॅलिऑन व पीऱ्हा यांची छोटी नाव पारनासस ( Parnassus )या पर्वताच्या दोन शिखराच्या बेचक्यात अडकली. पर्वतावर त्यांनी सुरक्षितपणे पाऊल टाकले. याबद्दल त्यानी प्रथम पर्वतावरील देवदेवतांची प्रार्थना केली. त्यांचे आभार मानून आशीर्वाद मागितला.

त्याकाळी थेमीस ( Themis ) नावाची देवता भविष्य सांगत असे. तिची प्रार्थना या जोडप्यानी केली.

सगळे शांत झाले. स्थिरस्थावर झाले. त्यावेळी डिकॅअिनॉनला दिसले, सर्व पृथ्वी भकास झाली आहे. पृथ्वीवर प्राणी नाहीत. पक्षी नाहीत. मानव नाहीत. ही उजाड पृथ्वी पाहून त्याच्या डोळ्यात पाणी आले. त्याला दुःख झाले. तो पीऱ्हास म्हणाला– ' आपण किती नशिबवान आहोत पहा ! दोघेच या प्रलयातून जगलो आहोत. देवाची दया आहे आपल्यावर ! '

पीऱ्हाने होकार भरला.

पुढे तो म्हणाला, ' मला निर्माण करणाऱ्या देवासारखी मजजवळ शक्ती असती तर ? देवाने सृष्टी निर्माण केली. पशुपक्षी निर्माण केले. मानवजात जन्मास घातली. त्याचे निर्मितीचे कौशल्य अफाट आहे. माझ्यात निर्मितीची शक्ती असती तर मी पृथ्वीवर परत देश निर्माण केले असते. त्यांच्यात जीव भरला असता. जसा देवाने मातीला आकार देऊन त्यात प्राण भरला होता तसे मी केले असते. आणि आता सर्व मानवजात आपल्यावरच अवलंबून आहे. आपण दोघेच जिवन्त आहोत म्हणून ! '

जगाचे भवितव्य त्यांना भयाण वाटू लागले. त्यामुळे ते निराश झाले. आशेचा किरण दिसावा म्हणून ते थेमीस देवतेकडे

वळले. तिला त्यानी पुढचे जगाचे भविष्य सांगितले.

तर थेमीस जोराने म्हणाली, ' डिकॅलिऑन, पीऱ्हा, तुम्ही ताबडतोब येथून जा. तुमचे तोंड झाका. अंगावरचे झगे सैल करा. आणि पुढे जात असता, तुम्ही तुमच्या मोठ्या आईची हाडे मागे टाकत जा ! '

आता मोठ्या आईची हाडे म्हणजे काय ? दोघांच्याही लक्षात येईना. दोघे विचार करू लागली. डिकॅलिऑनच्या लक्षात आले— मोठी आई म्हणजे पृथ्वी आणि तिची हाडे म्हणजे दगड, गोटे.

दोघं नवराबायको दगड, गोटे गोळा करू लागली. ते झग्याच्या झोळात गोळा केले. तोंडावर कपड्याचा बुरखा टाकला. पुढे चालू लागले. पुढे जाता जाता मागे न बघता दगड, गोटे टाकू लागले. मागे ती दगडे, गोटे मोठे होत. त्यांना मानवाचा आकार प्राप्त होई. काही दगड, गोटे पुरुष बनले. काही स्त्रिया बनल्या आणि परत मानवजात निर्माण झाली.

यानंतर सूर्य तापू लागला. कारण प्रलयामुळे पृथ्वीवर झालेली ओल नाहीशी व्हायला पाहिजे होती. सूर्याच्या उष्णतेने ओल नाहीशी झाली. परत पृथ्वी उबदार बनली. परत पृथ्वीवर पशू–पक्षी निर्माण झाले. सृष्टी निर्माण झाली. या सृष्टीत काही नवीनता होती. कांही जुनेच होते. नवीन होते ते अद्‌भूत प्रकारचे वाटत होते.

अशा प्रकारे परत पृथ्वीवर नवीन मानवजात निर्माण झाली. आपण कठीण जातीचे मानले जातो. म्हणजे कठीण कामे करू शकतो. आपण काटक आहोत.

आपले मूळ दगड–गोट्याचे आहे !

म. ग्रं. सं. ... 
वा. क्र. 91636 दिनांक ......
विषय... .... 22/9/215
BVBK-0401737